**फौ.कि. अर्ज .क्र.३४/२०१८**

**निशाणी क्र.३४ लगत**

**जाबदेणारतर्फे सा. क्र.१**

**अर्जदारतर्फे पुढील उलटतपास वकिल श्री कडाळे यांचेमार्फत सुरुः-**

अर्जदारला पुर्वीचा पोटगीचा अर्ज दाखल त्यावेळीपासून पाठीच्या मणक्याचा त्रास असल्याचे मला माहित नाही. मी पोटगी आदेशाविरुध्द बारामती येथील न्यायालयात अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपिलाचा निकाल माझेविरुध्द लागला. अर्जदार व पाठीच्या मगक्याच्या आजाराबाबत अकलूज व सोलापूर येथे उपचार चालू असल्याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी विटभट्टी असून माझेकडे ट्रॅक्टर आहे. हे म्हणणे खरे नाही की माझेकडे बागायती शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला पोटगी वाढून द्यावी लागू नये म्हणून मी माझ्या जमीनी मुलांच्या नावे केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मला शेतीतून चांगले मिळत असल्याने अर्जदाराला वाढीव पोटगी देण्याची माझी ऐपत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदारला दरमहा रक्कम रु.१५,०००/- पोटगी देवू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मुळ अर्जाला दिलेल्या म्हणण्यातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास- नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2025.07.24 11:51:50 +0530

दिनांकः २३/०७/२०२५ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.